जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक २६.११.२०२६**

''भरोसा सेल, महिला तक्रार निवारण कक्ष, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांची सन २०२२ ते जुलै २०२६ पर्यंतची कामगिरी''

ठाणे पोलीस आयुक्तालयातील गुन्हे शाखा अंतर्गत भरोसा सेल, महिला तक्रार निवारण कक्ष येथे महिलांचे पती व सासरचे नातेवाईक यांचे संदर्भात तसेच पुरुषांचे पत्नीच्या विरोधात कौटुंबिक कारणावरुन तक्रारी अर्ज प्राप्त होत असतात. त्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर इकडील कार्यालयात पती-पत्नीचे एन.जी.ओ यांचे मार्फतीने समुपदेशन केले जाते. सदर समुपदेशनादरम्यान सन २०२२- २०७, सन २०२३-१४६, सन २०२४-११४, सन २०२५-१४९, तसेच १ जानेवारी २०२६ ते २३ नोव्हेंबर २०२६ पर्यंत १६६ असे एकुण ७८२ पती-पत्नीचे समुपदेशन करुन संसार पुन्हा जोडण्यात पोलीसांना यश आलेले आहे.

पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री.अमरसिंह जाधव, सहायक पोलीस, गुन्हे शोध-२, श्री.विनय घोरपडे यांचे मार्गदर्शनाखाल मपोउपनि/आकांक्षा काळे, पोउपनि/सुरेश मोरे, श्रेपोउपनि/जयश्री कदम, श्रेपोउपनि/कविता भोईर, श्रेपोउपनि/शुभदा पार्टे, मपोहवा/पल्लवी राऊत, मपोहवा/कुंती चोले, मपोहवा/विदया फापाळे, मपोहवा/सुनिता बागुल, मपोहवा/संगिता महाले, मपोशि/दिपाली जाधव, मपोशि/प्रियांका पाटील, मपोशि/पुजा जगताप यांनी अथक परिश्रम घेऊन पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर मधील भरोसा सेल येथे प्राप्त तक्रारी अर्जामधील पती-पत्नीचे समुपदेशन करुन आतापर्यंत एकुण ७८२ संसार जोडून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.